**L. A. BILL No. VII OF 2026.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA LIFTS, ESCALATORS AND MOVING WALKS ACT, 2017.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७.**

**महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १२ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१८ चा महा. १५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी ३३३९–१ (२५५–३-२०२६)

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ यामध्ये "विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने)" व "सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने)" या मजकुराऐवजी, "विद्युत निरीक्षक" व "सहायक विद्युत निरीक्षक" हा मजकूर दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) यामध्ये, या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे सुधारणा केल्याखेरीज, संपूर्ण अधिनियमात,— २०१८ चा महा. १५.

(१) ज्या ज्या ठिकाणी, "विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने)" हा मजकूर आला आहे, त्या त्या ठिकाणी "विद्युत निरीक्षक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) ज्या ज्या ठिकाणी "सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने)" हा मजकूर आला आहे, त्या त्या ठिकाणी "सहायक विद्युत निरीक्षक" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,-

(१) खंड (ठ) मधील, "कारखाना अधिनियम, १९४८" या मजकुराऐवजी, "व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२०" हा मजकूर दाखल करण्यात येईल; १९४८ चा ६३. २०२० चा ३७.

(२) खंड (म) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :-

"(य) "अधीक्षक अभियंता" याचा अर्थ, कलम ३ अन्वये शासनाने अधीक्षक अभियंता म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती, असा आहे.".

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील, खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(अ-१) अधीक्षक अभियंता ;";

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतीलः-

"(२) मुख्य विद्युत निरीक्षक हा, या अधिनियमान्वये नेमून दिलेल्या अधिकारांचा वापर करील व कार्ये पार पाडील आणि त्याखालील नियंत्रण, संनियंत्रण व समन्वय यांकरिता जबाबदार असेल.

(२अ) अधीक्षक अभियंता हा, या अधिनियमांन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांव्यतिरिक्त त्याच्या अधिकार क्षेत्रातील विद्युत निरीक्षकाच्या अधिकारांचा वापर करील.";

(३) समास टिपेतील, "मुख्य विद्युत निरीक्षक" या मजकुरानंतर, ", अधीक्षक अभियंता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये,-

(१) पोट-कलम (३) मधील, ज्या ज्या ठिकाणी "मुख्य विद्युत निरीक्षक" हा मजकूर आला आहे, त्या त्या ठिकाणी, "अधीक्षक अभियंता" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (४) मधील, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडून" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,— सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (२) मधील, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडे" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याकडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (३) मधील, "मुख्य विद्युत निरीक्षकास" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) पोट-कलम (५) मधील, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडे" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याकडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,— सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ७ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (३) मध्ये, "मुख्य विद्युत निरीक्षक" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे, त्या दोन्ही ठिकाणी "अधीक्षक अभियंता" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (४) मधील, "मुख्य विद्युत निरीक्षक" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील,- सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ८ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (२) मध्ये, "विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याची" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याची" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (५) मध्ये, "विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यास" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, "विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याची" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याची" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १० ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील, पोट-कलम (५) मधील, उप-खंड (ख) मध्ये, "भारतीय दंड संहितेच्या कलम १७६" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २११" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १५ ची सुधारणा.

१८६० या ४५. २०२३ चा ४५.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, "मुख्य विद्युत निरीक्षक" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंता" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये,- सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २० ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मध्ये,—

(क) "मुख्य विद्युत निरीक्षकाच्या" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "राज्य शासनाकडे" या मजकुराऐवजी, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतीलः—

"(२) कलम ८ च्या पोट-कलम (५) अन्वये, अधीक्षक अभियंत्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, मुख्य विद्युत निरीक्षकाकडे अपील दाखल करता येईल.

(३) कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये, अधीक्षक अभियंत्याच्या आदेशाविरुद्ध मुख्य विद्युत निरीक्षकाकडे दाखल केलेल्या कोणत्याही अपिलामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग बंद ठेवण्याविषयी अधीक्षक अभियंत्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे, मुख्य विद्युत निरीक्षकाने अशा आदेशास स्थगिती दिली नसेल तर पालन करण्यात येईल.

(४) मुख्य विद्युत निरीक्षकाने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाकडे, अपील दाखल करता येईल आणि राज्य शासनाचा अपिलावरील निर्णय हा अंतिम असेल.".

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २१ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मधील,-

(१) पोट-कलम (१) मध्ये, "विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याला" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याला" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मध्ये, "विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास" या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मध्ये, ज्या दोन ठिकाणी "विद्युत निरीक्षक (उद्वाहने)" हा मजकूर आला आहे, त्या दोन्ही ठिकाणी "अधीक्षक अभियंता" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "शासनाकडे दाखल करण्यात येईल व त्यावर शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहील" या मजकुराऐवजी, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडे दाखल करण्यात येईल. मुख्य विद्युत निरीक्षक, तीस दिवसांच्या आत अशा अपिलावर निर्णय देईल.".

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मधील, "विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याच्याकडून " या मजकुराऐवजी, "अधीक्षक अभियंत्याकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, "मुख्य विद्युत निरीक्षकाकडे" या मजकुरानंतर, ", अधीक्षक अभियंत्याकडे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, "मुख्य विद्युत निरीक्षक ," या मजकुरानंतर, "अधीक्षक अभियंता," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) मध्ये, "मुख्य विद्युत निरीक्षक," या मजकुरानंतर, "अधीक्षक अभियंता," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७. ]**

**[ महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री**]**

**(विधानसभेने दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १२ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.